पुढारी

# 'असमानता, दारिद्र्य' ग्रंथाचे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे 'असमानता आणि दारिद्र्य' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मंगळवारी (दि. १५) दुपारी ४ वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. डॉ. जगन कराडे व डॉ. राजेंद्र पाटील यांनी संपादित पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील.

पुढारी

# विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामध्ये १७ व १८ फेब्रुवारी रोजी साहित्य अकादमी नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट व मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सावानिमित्त 'लोकमान्य टिळक : व्यक्ती आणि कार्य' या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासंत्राचे उद्घाटन १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

याप्रसंगी साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवासन, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे उपस्थित राहणार आहेत. राजन गवस, डॉ. अशोक चौसाळकर, एकनाथ पगार, वर्षा तोडमल, नंदकुमार मोरे, अरुण भोसले सहभागी होणार आहेत. अकादमीच्या मराठी, इंग्रजी, हिंदी ग्रंथांचे प्रदर्शन भरवले आहे. चर्चासत्रात सहभागी होण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

15 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात पहिल्या दिवशी १२८८ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना प्रादुर्भावामुळे शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्राच्या ६६४ अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ स्तरावरील ३६२ परीक्षांपैकी काही परीक्षांना सोमवारपासून ऑनलाईन पद्धतीने सुरुवात झाली.

पहिल्या दिवशी बी.टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स, केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. या अभ्यासक्रमांच्या १२८८ पैकी १२८७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

या सर्व परीक्षांसाठी एकूण १ लाख २८ हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रॉक्टरिंग पद्धत सुरू केली आहे. यासाठी विद्यापीठाकडून विशेष पथक नेमण्यात आले आहे.

या पथकाकडून हेडफोन वापरून गैरप्रकार करणाऱ्या, अन्य मोबाईल वापरून इतरांशी दूरध्वनीवरून बोलणाऱ्या,, एकाच फ्रेममध्ये दोन विद्यार्थी दिसणाऱ्या विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करून परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

सकाळ

# संशोधन शिष्यवृत्तीसाठी अर्ज पाठविण्याचे आवाहन

Sakal
India Foundation
a medium for social change

**पुणे, ता. १४ :** संशोधनपर कामासाठी २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता दिली जाणारी 'सकाळ इंडिया फाउंडेशन शिष्यवृत्ती' आणि 'ओक संशोधन पाठ्यवृत्ती'साठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन 'सकाळ इंडिया फाउंडेशन'ने केले आहे.

कोणत्याही क्षेत्रात संशोधन करणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षकांना दरवर्षी सकाळ इंडिया फाउंडेशनची शिष्यवृत्ती देण्यात येते. तर हृदयविकार, मधुमेह, कर्करोग, जैवतंत्रज्ञान व कुक्कुटपालन तसेच प्राणिशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ, वनस्पतिशास्त्र व बायोकेमिस्ट्री या क्षेत्रात संशोधन करणाऱ्यांना 'दामोदर माधव ओक' व 'सुधा दामोदर ओक' यांच्या नावाने पाठ्यवृत्ती देण्यात येते. महाविद्यालये, विद्यापीठे किंवा संबंधित संशोधन संस्थांमध्ये संशोधन करणारे विद्यार्थी व शिक्षक यासाठी अर्ज करू शकतील.

निवड झालेल्या संशोधकांना शिष्यवृत्ती, पाठ्यवृत्ती म्हणून संशोधनावर होणाऱ्या खर्चापोटी प्रत्येकी ४० हजार रुपये दोन समान हप्त्यात देण्यात येतील. संशोधन प्रकल्पाच्या पहिल्या वर्षातील प्रगतीचे तज्ज्ञांमार्फत अवलोकन केल्यानंतर दुसऱ्या वर्षासाठी तेवढीच रक्कम मंजूर करण्याबाबत विचार होईल.

## असे पाठवा अर्ज

शिष्यवृत्ती आणि पाठ्यवृत्तीच्या छापील अर्जासाठी इच्छुकांनी विनंती पत्रासोबत, संशोधन नोंदणीपत्र तसेच दहा रुपयांचे टपाल तिकीट लावलेले व स्वतःचे नाव, संपर्क क्रमांक, पत्ता लिहिलेले पाकीट खालील पत्त्यावर पाठवावे 'सकाळ इंडिया फाउंडेशन, प्लॉट नं. २७, नरवीर तानाजी वाडी, पीएमटी डेपो, साखर संकुल जवळ, शिवाजीनगर, पुणे ४११००५. दरम्यान विनंती अर्ज सोमवारपर्यंत (ता. २८) पाठवावेत. संपूर्ण भरलेले अर्ज ८ मार्च २०२२ पर्यंत स्वीकारण्यात येतील. अर्जांची छाननी व आवश्यकतेनुसार इच्छुकांच्या मुलाखती झाल्यानंतर सकाळ इंडिया फाउंडेशन शिष्यवृत्तीसाठी दोन आणि ओक संशोधन पाठ्यवृत्तीसाठी दोन अशा चार संशोधकांची निवड करण्यात येईल.

**अधिक माहितीसाठी संपर्क : (०२०) २५६०२१०० (Ext १७४), ६६२६२१७४ इ मेल :** contactus@sakalindiafoundation.org / sakalindiafoundation@esakal.com

तरूण भारत

# लोकमान्य टिळकांचे कार्य विषयावर गुरूवारी चर्चासत्र

कोल्हापूर : साहित्य अकादमी नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट आणि मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सावानिमित्त चर्चासत्राचे आयोजन केले आहे. 'लोकमान्य टिळक : व्यक्ती आणि कार्य' हा या कार्यशाळेचा विषय आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये गुरूवार १७ रोजी सकाळी चर्चासत्राचे उद्‌घाटन होणार आहे, अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. डॉ. राजन गवस, अशोक चौसाळकर, एकनाथ पगार, वर्षा तोडमल, नंदकुमार मोरे, भारती पाटील, अभय टिळक सहभागी होणार आहेत.

Times of India

# 1L appear for Shivaji varsity exams online from Monday

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The exams for the colleges in Kolhapur, Sangli and Satara districts affiliated to the Shivaji University, Kolhapur, commenced online from Monday for the second and third year students. More than one lakh students from these three districts will be giving their exams.

Mr Gajanan Palse, in-charge director of the Board of Examinations and Assessment, said, "The exams for 664 courses of Shivaji University, Kolhapur, began on a smooth note at 362 examination centres. A total of 1,28,000 students will be appear for these exams. All the students have already been sent the login and password for the exam via SMS. Also, the schedule for all the examinations has been published on the website of the university."

The system of the university as well as the software supplier company has been kept in operation to solve the technical problems, if any faced by the students during the online examination. Today, BTech exams were undertaken for electronics & telecommunication, computer science, chemical engineering, civil engineering, mechanical engineering.

From this exam, the university has started proctering system to control the students who misbehave in the exam. A special team has been appointed by the university for this. If found, such students will be registered for malpractice and action will be taken by examination committee as per the rules. Also, in order to maintain the sanctity of the examination, the students should take the online examination as per the instructions given, added Palse.